Ind - 9

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. Email ID :<br>sncureport@gmail.com,<br>assemblychildhealth@gmail.com |
| आरोग्य सेवा<br>आरपीडी | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य/माहिती अधिकार/ Arun Gupta /न.क्र.४९0 /910323-29 /२०,<br>दि. 02/03/२०२० |

प्रति,

Dr. Arun Gupta,

BP- 33 Pitampura

Delhi 110034

विषयः- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेला अर्ज

संदर्भः- आपला माहितीच्या अधिकाराचा दि. ३.०२.२०२० रोजीचा ऑनलाईन अर्ज या कार्यालयात दिनांक १८.०२.२०२० रोजी प्राप्त झालेला अर्ज

उपरोक्त विषयांचे संदर्भिय पत्रान्वये माहिती अधिकार या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदरचे विषयाशी संबंधित या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

मुद्दा क्रमांक १, २, ३ व ५ हे सहसंचालक आरोग्य सेवा, ( हिवताप , हत्तीरोग व जलजन्य रोग) येरवडा,पुणे ६ या कार्यालयाशी संबंधित असल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३) मधील तरतुदीनुसार सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सहसंचालक आरोग्य सेवा, ( हिवताप , हत्तीरोग व जलजन्य रोग) येरवडा,पुणे ६ यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येत आहे. तरी यासंदर्भात पुढील पत्रव्यवहार परस्पर त्या कार्यालयाशी करुन माहिती प्राप्त करुन घ्यावे, ही विनंती.

(डॉ. लांडगे घोडके)

जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा,

कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे १

**प्रत पुढील कार्यवाहीस्तव**- सहसंचालक आरोग्य सेवा, ( हिवताप , हत्तीरोग व जलजन्य रोग) येरवडा,पुणे ६ याना माहिती अधिकाराच्या मुळ अर्जासह पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित. मुद्दा क्रमांक १, २, ३ व ५ ची माहिती अर्जदारास देण्यात यावी.

**प्रत माहितीस्तव सादर** - श्रीमती. उज्जवला अ. रणशिंग, अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई १

| Sr. No | Asked Information | Given Information |
|---|---|---|
| 1 | Please provide a copy of the State health plan dealing with emergency situations/emergency preparedness and its content with regard to infant and young child feeding practices | • Related to Joint Director, NVBDCP, Pune.<br>• Guidelines (5 pages) on Nutrition in emergency were issued to District which is attached with this letter |
| 2 | Please share information on funds allocated for implementation of the state health plan | • Related to Joint Director, NVBDCP, Pune. |
| 3 | Does the State plan or any policy during emergency response protect women from the marketing of commercial baby foods, Provide relevant document | • Related to Joint Director, NVBDCP, Pune.<br>• However guidelines (5 pages) on Nutrition in emergency were issued to District which is attached with this letter<br>• IMS act is strictly followed by public health facilities. |
| 4 | What are the services to support breastfeeding mothers within the state health plan | • Conducting mothers meeting under MAA program<br>• Promotion of breastfeeding through ASHA & ANM on VHSND day<br>• During home visit ASHA is counseling under HBNC and HBYC program<br>Apart from this, as a state initiative<br>• Establishment of Hirakani kaksh in Health facilities<br>• BFHI accreditations of public health facilities are being implemented. |
| 5 | Does the plan provide separate space for counseling within the emergency preparedness plan | • Related to Joint Director, NVBDCP, Pune. |
| 6 | What is policy to accept or reject donations of infant formula or commercial baby foods for children under the age 2 during emergency response? Please provide a copy | • Under IMS Act it is strictly followed by public health facilities.<br>• Also guidelines (5 pages) on Nutrition in emergency were issued to District which is attached with this letter |
| 7 | Is there a documented report on infant feeding during emergencies for any such event in your State, If yes please provide a copy. | • Report is not available, however guidelines (5 pages) on Nutrition in emergency were issued to District which is attached with this letter. |

**( Dr. Lochana Ghodke )**
**Public information Officer & Deputy Director Health Services**
**State Family Welfare Bureau, Pune**

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य



| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७२ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, रायबहादूर मिलगेट, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८३३३ / २६०५८२१८ / २६०५८१०७.<br>Email ID : spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य-१५(क)/ पुरग्रस्त परिस्थितीच्या मार्ग.सूचना/ ४९५६५-६७० /२०१९,<br>दि. १६/०८/२०१९. |



प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
   जिल्हा परिषद.... सर्व

२) जिल्हा शल्य चिकित्सक,
   जिल्हा रुग्णालय....सर्व

३) वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
   महानगरपालिका.......सर्व

**विषय :- आपात्कालीन /पुरग्रस्त परिस्थितीत अर्भक व बालकांच्या पोषण विषयाबाबत...**

उपरोक्त विषयानुसार सर्व जिल्हयांना कळविण्यात येते की, आपल्या राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा स्थितीत लहान बालके ही सर्वाधिक असुरक्षित असतात. तसेच त्यांच्यामध्ये अतिसार, कुपोषण इ. चे प्रमाण वाढुन बाल मृत्युदरात वाढ होऊ शकते. त्यासाठी स्तनपान हे अर्भकाचे व बालकाचे जीव वाचवणारी महत्वाची उपाययोजना आहे. त्या अनुषंगाने आपात्कालीन / पुरग्रस्त परिस्थितीत अर्भक व बालकांच्या पोषण विषयाबाबत मार्गदर्शक सुचना तयार केल्या आहेत. तरी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करुन त्याची अंमलबजावणी करावी.

**अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा**
**कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे**

**प्रत माहितीस्तव –**
उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळ .....सर्व

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

- मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
- मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

Scanned with CamScanner

# आपात्कालीन परिस्थितीमध्ये अर्भकांचे व बालकांचे पोषण

## *स्तनपान व इतर पर्याय*

**उद्दिष्ट:**

- आपात्कालीन स्थितीत स्तनपानाच्या महत्वाच्या भूमिकेकडे जगाचे लक्ष वेधणे.
- स्तनपान करणाऱ्या मातेस व शिशूस आपत्कालीन स्थितीत स्तनपानास सुरक्षा देणे आणि स्तनपान करण्याच्या गरजेस दुजोरा देणे.
- मातांना, स्तनपानाविषयी जनजागृती करणारे समर्थक, जनसमुदाय, आरोग्यव्यावसायिक, शासकीय आणि अशासकीय संस्था, दाता आणि माध्यम यांना स्तनपानास समर्थन करण्याच्या त्यांच्या भूमिकेविषयी माहिती देणे.
- पालन-पोषण विषयी काम करणारे गट/समूह/संस्था, स्तनपानाबाबतचे कौशल्य व योग्य पध्दत माहिती असणारे तसेच आपात्कालीन स्थितीत सामील असलेल्या सर्वांना एकत्र काम करण्यास गतिशील करणे.

## आपात्कालीन परिस्थिती म्हणजे काय ?

आपात्कालीन परिस्थिती ही अतिशय असामान्य स्थिती आहे ज्यामुळे लोकांचे आरोग्य व जगणे धोक्यात येते. आपत्ती नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असू शकते. हि परिस्थिती अंदाज न बांधता येण्याजोगी, सातत्याने होणारी अथवा दीर्घकाळ पर्यंत राहणारी असू शकते. आपत्ती ही असुरक्षितता, अस्वच्छता, अस्थैर्य आणि स्वच्छ अन्न, पाणी, इंधन, वैद्यकीय आधार आणि निवारा यांची कमतरता ह्यांनी दर्शवली जाते. आपात्कालीन परिस्थिती मध्ये -

- तेथे स्वच्छ व सुरक्षित पाणी नसेल.
- तेथे स्वच्छ व सुरक्षित वातावरण नसेल.
- आहारासाठी उपयोगात येणारी भांडी स्वच्छ व निर्जंतुक असल्याची खात्री करणे शक्य नसेल.

## ही बाब समाजासाठी का महत्वाची आहे?

जगात नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीची संख्या वाढत आहे आणि ह्याचा परिणाम कोणत्याही देशात होऊ शकतो मग त्या देशाचे भौगोलिक स्थान व प्रगतीचा स्तर ह्याच्याशी आपत्तीचा कसलाही संबंध नसतो. म्हणजेच प्रत्येक जण प्रत्येक ठिकाणी स्तनपानास सक्रीय समर्थन देण्याबाबत जागरूक असणं आणि तयार असणं गरजेच आहे. तसेच समाजासाठी का महत्वाचे याची करणे खालीलप्रमाणे आहेत

- आपत्कालीन समयी बालके सर्वात असुरक्षित असतात - बालमृत्यूदरात अतिसार, श्वसनविकार व कुपोषणामुळे सरासरी पेक्षा २ ते ७० पटीने अधिक वाढ होऊ शकते.
- स्तनपान हे बालकांचे जीव वाचवणारी महत्वाची उपाययोजना आहे आणि लहान मुलांची सुरक्षितता अतिशय महत्वाची आहे. इतकेच नाही तर विना-आपात्कालीन समयी सुद्धा स्तनपान न करणाऱ्या २ महिन्याखालील बालकांमध्ये मृत्यूचा धोका ६ पटीने अधिक असतो.
- आपत्ती ही जगात कुठेही घडू शकते. जे काही 'सामान्य' आहे, त्याचा विनाश करते. अशा परिस्थितीत बालके ही रोग आणि मृत्यूला सहजतेने बळी पडतात आणि पालकांना त्यासाठी संघर्ष करावा लागतो.
- आपात्कालीन परिस्थितीत, मातेला स्तनपान नियमित चालू ठेवण्यासाठी किंवा पुनर्स्थापित करण्यासाठी सक्रीय आधाराची अत्यंत आवश्यकता असते.

Scanned with CamScanner

वरील बाबी सन २००५-०६ मध्ये बोत्स्वाना मध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थिती मध्ये प्रकर्षाने निर्देशनास आल्या. पूर परिस्थितीमुळे स्तनपान न करणाऱ्या बालकांत अतिसार व मृत्यूचा धोका वाढला. २००५ च्या पहिल्या तिमाहीचे तुलनेत २००६ च्या पहिल्या तिमाहीत, पाच वर्षाखालील बालकांचा मृत्युदर २२ पटीने जास्त नोंदविला गेला. तेथील एका रुग्णालयातील अभ्यासानुसार आढळून आले की, स्तनपान न करणारी बालकं ही स्तनपान करणाऱ्या बालकांपेक्षा ५० पटीने अधिक रुग्णालयातील उपचारासाठी दाखल होण्याची आणि मृत्यू होण्याची शक्यता असते.

म्हणून आपात्कालीन परिस्थितीसाठीची सुसज्ज तयारी बालकांसाठी अत्यंत महत्वाची आणि जीवनावश्यक आहे. विना-आपत्त्ती काळात मातेला दिलेला स्तनपानाविषयीचा भक्कम आधार हा तिला आपात्कालीन स्थितीसाठीही तयार करतो तसेच स्तनपान हे बालकांना आपत्तीपासून वाचविण्यासाठीची ढाल आहे.

## अनेकदा आपत्तीमध्ये स्तनपानास कमी महत्व दिले जाते कारण...

- स्तनपाना विषयी माहितीचा अभाव.
- स्तनपानासाठी सुरक्षितता आणि आधाराचा अभाव.
- पावडरचे दूध (इन्फंट फॉर्म्युला), दूधाची इतर उत्पादने आणि दूधाची बाटली यांची देणगी.

## आईच्या दूधाचे महत्व

- हे बालकासाठी सर्वात स्वच्छ आणि सुरक्षित अन्न आहे.
- हे पोषणाच्या दृष्टीकोनातून अतिशय योग्य आहे.
- कोणत्याही वेळेला उपलब्ध राहते त्यामुळे कोणावर ही अवलंबून राहण्याची गरज नाही.
- अतिसार, श्वसनदाह(न्युमोनिया) इ. संक्रमित आजारापासून बालकाला संरक्षण मिळते.
- आईचे दूध योग्य तापमानात असते त्यामुळे बालकाचे तापमान कमी होण्यापासून बचाव करते.
- स्तनपान करत असताना शरीरात निर्माण होणाऱ्या संप्रेरकामुळे आईचा मानसिक ताण कमी होतो.

## बाजारातील तयार दूधाचे दुष्परिणाम (फॉर्म्युला मिल्क)

- बालकाला रोगप्रतिकारक शक्ती देऊ शकत नाही.
- बालकाच्या आतडयाच्या संरक्षण यंत्रणेला नुकसान पोहचवते आणि जंतूसंसर्ग सहजतेने होतो.
- ते उपलब्ध होईलच असे नाही.
- शिफारशीप्रमाणे तयार किंवा साठवणूक केली नाही तर ते दुषित पण होऊ शकते.
- पावडरचे दूध तयार करण्याच्या शिफारशीप्रमाणेच तयार केले जाईल असे नाही.
- पावडरचे दूध तयार करण्यासाठी वापरलेले पाणी दुषित असू शकते.
- पावडरपासून तयार केलेले दूध, दूध पाजण्यासाठी वापरली जाणारी वाटी चमचा, निप्पल हे निर्जंतुक करण्याची सुविधा उपलब्ध नसू शकेल.
- तेथे विद्युत पुरवठा खंडित झालेला असेल तर तयार सीलबंद पाकीट/डबा उघडल्यानंतर उर्वरित दूध थंड ठेवण्यासाठी रेफ्रिजरेटरचा पर्याय वापरता येणार नाही.


## स्तनपानाविषयक सत्य

- आपात्कालीन स्थितीत योग्य मार्गदर्शन व आधार मिळाल्यास तणावा कमी होऊन आईचे दूध वाढेल/पूर्व पदावर येईल.
- कुपोषित माताही स्तनपान देऊ शकते.
- बालकांच्या मागणीनुसार स्तनपान दिल्यास पुरेसे दूध तयार होते.
- काही माता व बालकांच्या बाबतीत थांबविलेले स्तनपान यशस्वीरीत्या सुरु करता येते त्यासाठी आईला खालील प्रमाणे मदत करावी.

Scanned with CamScanner

1. आईचा व बाळाचा अनावृत्त स्पर्श(skin-to-skin contact) देण्यास व दर दोन तासाने बाळाला स्तनपान देण्यास आईला प्रोत्साहन द्यावे.
2. यामुळे आईचे दूधाचा पुरवठा दिवस दिवस वाढत जाईल/पूर्व पदावर येईल.
3. शिशुपोषणाच्या व बाळाच्या जलस्थितीची(hydration) काळजीपूर्वक तपासणे व निरीक्षण करणे आवश्यक आहे.
4. या काळात मातेला स्तनपानासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे असते.

## आपात्कालीन स्थिती व बालकांचे पोषण




## आपात्कालीन परिस्थितीमध्ये करावयाची कृती

आपात्कालीन परिस्थितीत स्तनपान चालू ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग , महिला व बाल कल्याण विभाग , माध्यमे व समाजाने खालीलप्रमाणे कृती करणे अपेक्षित आहे

- कुटुंबातील सर्व व्यक्तींना विशेषतः: आई व बाळास एकत्र ठेवा.
- गरोदर माता आणि स्तनदा मातांसाठी सुरक्षित वातावरण / जागा तयार करा. या जागी त्यांना सुरक्षितता मिळू शकेल, समुपदेशन देता येईल , पाणी आणि अन्न मिळू शकेल याची खात्री करावी. विविध कार्यालयाच्या इमारती , शाळा, हॉस्पिटल आणि इतर निवारे यांचा सुद्धा वापर केला जाऊ शकतो.
- एका वर्षापेक्षा लहान व दोन वर्षा पेक्षा लहान व दोन वर्ष पेक्षा थोडया मोठया बालकांसाठी ही पूरक आहार उपलब्ध नसेल/कमी प्रमाणात उपलब्ध असेल तरी सुद्धा तर आईचे दूध त्याच्या पोषणासाठी महत्वाचा पर्याय असतो हे मातांना व इतरांना पटवून द्यावे.

Scanned with CamScanner

- बेवारस लहान बालकांसाठी एच. आय. व्ही. ग्रस्त नसलेल्या मातेने दान केलेले दूध हा एक पोषणाचा चांगला पर्याय आहे हे समजावून सांगा.
- पहिल्यांदा प्रसूत झालेल्या मातांना एक तासाच्या आत स्तनपानास सुरवात करण्यासाठी मदत करा , ६ महिन्यापर्यंत फक्त स्तनपानच देण्यासाठी आधार द्या आणि पुढे दोन वर्षापर्यंत स्तनपान चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहित करा.
- अर्भकाची जलस्थिती(hydration) आणि पोषणस्थिती पाहून स्तनपानाबाबत आधार द्या.
- आईचे दूध उपलब्ध होतच नसल्यास बाजारातील तयार दूध द्यावे लागू शकते. पावडरचे दूध तयार करण्यास फक्त उकळलेले पाणी किंवा सीलबंद बॉटल मधील स्वच्छ पाणी( मिनरल वाटर ) वापरावे.
- पूर परिस्थिती दरम्यान पोलिओ, हिपाटायटीस बी, धनुर्वात, घटसर्प, डांग्या खोकला, रोटा व्हायरस, मेंदूज्वर, रुबेला आणि विशेषतः गोवर या लसी दिल्या नसल्यास शिफारसीप्रमाणे प्राधान्याने द्या.
- विशिष्ट आजार असलेल्या स्तनदा माता उपचार घेत असतील तर प्रतिबंधात्मक काय काळजी घ्यावयाची यासाठी माहिती द्यावी.
- स्तनपानास मदत करणे, प्रोत्साहन देणे आणि आधार देण्यासाठी आपात्कालीन स्थितीत काम करत असलेल्या संस्था आणि कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करा, महत्व पटवून द्या, शिशु पोषणाच्या विविध पद्धती आणि विविध स्त्रोत यांची माहिती घेणे, समन्वय आणि सनियंत्रण करणे हे पूर्ण आपात्कालीन स्थितीत करणे अपरिहार्य आहे.
- इन्फंट फॉर्म्युला, दूधाचे उत्पादन, बाटली इ. च्या केलेल्या देणगीस विरोध करा (I.M.S. Act) स्तनपानाचे महत्व अधिकृत विधानांनी ठळक करून माध्यमाद्वारे प्रकाश झोतात आणा.
- माध्यमांद्वारे योग्य माहिती देऊन चुकीची माहिती प्रचार होण्यास प्रतिबंध करा.

## आपात्कालीन परिस्थितीसाठीची यशाची गुरुकिल्ली

- **आत्मविश्वासू माता:** स्तनपान करणाऱ्या माता आत्मविश्वासू असल्यास आपात्कालीन स्थितीत त्या स्तनपान करू शकतात आणि आपल्या बाळांना सुरक्षित ठेऊ शकतात.
- **स्वतःला सुशिक्षित करा:** महत्वाच्या संसाधनांचा वापर करा, सल्ला घ्या आणि मार्गदर्शक तत्वांचा आभ्यास करा.
- **इतरांनां सुशिक्षित करा:** कुटुंबाशी, मानवतावादी संस्थेत कार्यरत व्यक्तींशी, देणग्या देणाऱ्या संस्था व व्यक्ती आणि माध्यमांशी बोला.
- **साहाय्य करणाऱ्या आणि देणगी देणाऱ्या संस्थांशी संलग्नित रहा:** स्तनपानास समर्थन करणाऱ्या धोरणांना जाणून घ्या, आपात्कालीन स्थितीत तुम्ही कशा प्रकारे मदत करू शकता ह्याची माहिती करून घ्या, इन्फंट फॉर्म्युला / दूधाच्या बाटल्या यांची देणगी देणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्या विरोधात उभे रहा. स्तनपानास समर्थन करणाऱ्या संस्थांचे समर्थन करा.
- **स्वतःच्या देशातील आपात्कालीन पूर्वतयारीमध्ये सामील व्हा:** आपात्कालीन परिस्थितीत काम करणाऱ्या विविध सदस्यांचा गट तयार करा व समूहांना एकत्रित आणा.
- **पूर्वतयारी हीच उपाययोजनेची गुरुकिल्ली आहे.**

**चला - आपण सगळे मिळून मातांसाठी व बालकांसाठी एक चांगले पोषक वातावरण तयार करण्यासाठी मदत करू.**

**मी तयार आहे........काय तुम्ही तयार आहात?**

**हो, तुम्ही नक्कीच तयार आहात!!!!!!!**

Scanned with CamScanner